पुणे महानगरपालिका

*विधी समिती*

तहकूब सभा परिपत्रक

विधी समितीची तहकूब सभा (गुरुवार दि. १३/१२/२०१८ रोजी कोरम अभावी तहकूब झालेली ) गुरुवार दि. २७.१२.२०१८ रोजी दुपारी ३.५५ (तीन वाजून पंचावन्न मि.) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरेल

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्र.२४**

मा.सौ.मंजुश्री खर्डेकर व मा.सौ.स्वप्नाली प्रल्हाद सायकर यांचे दि.२३/८/२०१८ चे पत्र

पुणे महानगरपालिकेच्या विरूध्द किंवा महानगरपालिकेने लावलेल्या अनेक केसेस विविध कोर्टामध्ये चालु आहेत. कोणत्या कोर्टामध्ये, कोणत्या केसेस आहेत तसेच त्याची प्रत्येक तारखेनुसार असलेली प्रगती ही महापालिकेच्या सदस्यांना समजणे आवश्यक आहे.

तरी याबाबतचा अहवाल दर महिन्याला विधी समितीपुढे सादर करण्यात यावा.

**विषय क्र.२५**

मा.बाळा ओसवाल व मा.सौ.चाँदबी हाजी नदाफ यांचे दि.२३/१०/२०१८ चे पत्र

मे.उच्च न्यायालयाने बेकायदेशीर जाहिरात फलक तातडीने हटविण्यात यावे व त्याचा अहवाल मे.न्यायालयास सादर करावा असा आदेश मनपा प्रशासनास दिलेला होता.जाहिरात नियमावली २००३ चे पालन न करणारे जाहिरात फलक मे.उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेशाव्दारे बेकायदेशीर ठरविलेले असताना देखील पुणे शहरात मोठया प्रमाणावर बेकायदेशीर जाहिरात फलक आहेत. अस्तित्वातील बेकायदेशीर जाहिरात फलकांना जाणीवपुर्वक चुकीच्या पध्दतीने परवानगी व नूतनीकरण दिल्याचे निदर्शनास येत आहे. सदर जाहिरात फलक हे जाहिरात नियमावली २००३, विकास नियंत्रण नियमावली,वाहतूक पोलीस ना– हरकत दाखला, मे.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे उल्लघंन करीत आहेत. जुना बाजार दुर्घटनेनंतर मा.सभासदांनी मा.मुख्य सभेत आक्षेप नोंदविल्यानंतर मा.महापालिका आयुक्तांनी एका महिन्यात शहरातील सर्व कायदेशीर जाहिरात फलकांवर कारवाई करण्याचे आश्वासित केलेले आहे.सबब पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील सर्व बेकायदेशीर जाहिरात फलक हटविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.जाहिरातदार हे मनपाने दिलेली परवानगी व नूतनीकरण यामुळे झालेला आर्थिक खर्च ही बाब निर्देशित करत मे.न्यायालयाची दिशाभूल करून एकतर्फा मनाई हुकूम/स्टेटस को मिळविण्याची दाट शक्यता आहे.सदर न्यायलयीन प्रक्रियेस बराच अवधी लागणार असल्याने शहरातील सर्व बेकायदेशीर जाहिरात फलकांवर मनपास कारवाई करता येणार नाही.सबब मनपा प्रशासनाने तात्काळ कारवाई प्रस्तावित असलेल्या सर्व जाहिरात फलकांबाबत मे. न्यायालयात कॅव्हेट अर्ज दाखल करावा,जेणेकरून जाहिरातदारांना मनपाविरूध्द एकतर्फा मनाई हुकूम/स्टेटस को मिळणार नाही.बेकायदेशीर जाहिरात फलक हे नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने धोकादायक असल्याने न्यायप्रविष्ठ प्रकरण झाल्यास मनपा हिताची बाजू सक्षमतेने मांडण्यासाठी ज्येष्ठ विधी तज्ञांची नियुक्ती करण्यात यावी.

(टीप–विषय क्र.२४ व २५ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**